# महान आज्ञेचे

## पुस्तक



## जा आणि शिष्य बनवा

मत्तय २८:१९

विषयसूची:

# महान आज्ञेचे पुस्तक


1. महान आज्ञा म्हणजे काय? ........................................................................................3

2. महान आज्ञेसाठी कोणते संदर्भ आहेत? ...................................................................3

3. महान आज्ञेचा महान निष्कर्ष काय आहे? ...............................................................3

4. शिष्य कोण आहे? आपण शिष्य कसे बनवायचे? ..................................................3

5. कार्य पूर्ण झाल्यावर ते कसे दिसेल? .........................................................................3

6. महान आज्ञा कार्य पूर्ण करण्यासाठी काय लागेल? ..................................................3

7. महान आज्ञा पूर्ण करण्यासाठी ४ जमीन दृष्टीकोन काय आहे? ...................................3

8. महान आज्ञेच्या पूर्णतेसाठी दर्शनाच्या ९ पायऱ्या ....................................................4

9. रिकाम्या जमीनी काय आहेत......................................................................................5

10. आपण रिकामी जमीन कशी तयार करतो? ............................................................ 5

11. चालत प्रार्थना म्हणजे काय? ..................................................................................... 5

12. मी चालत प्रार्थना कशी करावी? ...............................................................................6

13. आपण बिया कशा पेरल्या पाहिजेत? मी सुवार्ता कशी सांगावी?...............................6

14. सुवार्ता सांगत असताना विचारण्यासाठी काही नमुना प्रश्न.........................................7

15. एखाद्या व्यक्तीचे तारण कसे होऊ शकते? ................................................................7

16. सुवार्ता सांगत असताना वापरण्यासाठी काही नमुना विधाने .......................................7

17. मी एखाद्याला तारण अनुभवाकडे कसे नेऊ शकतो? ..............................................7

18. तारणानंतर लगेचच नवीन विश्वासणाऱ्याला मी काय शिकवावे?...............................8

19. येशूच्या सात आज्ञा काय आहेत? ..............................................................................8

20. दीर्घकालीन शिष्यत्व म्हणजे काय? ..........................................................................9

21. मंडळ्यांची स्थापना.................................................................................................11

22. नेत्यांना सुसज्ज करणे............................................................................................. 12

23. मंडळी लावणी चळवळ काय आहे?.........................................................................12

24. शिष्य बनवण्याची चळवळ काय आहे? ....................................................................12

25. शिष्य बनवणे म्हणजे काय? .....................................................................................13

26. आज्ञापालन-आधारित शिष्यत्व काय आहे? ............................................................13

27. महान आज्ञेचे कार्य पूर्ण झाल्यावर ते कसे दिसेल? ................................................13

28. महान आज्ञा पूर्ण करण्याच्या सोप्या व्याख्या: .........................................................13

29. महान आज्ञा कार्य पूर्ण केले जाऊ शकते का? .......................................................13

# महान आज्ञेचे पुस्तक

**1. महान आज्ञा म्हणजे काय?**
   a. ही येशू ख्रिस्ताची शेवटची आज्ञा आहे.

**2. महान आज्ञेसाठी कोणते संदर्भ आहेत?  वाचा आणि पाठांतर करा.**
   1. मत्तय २८:१८-२०
   2. मार्क १६:१५
   3. मार्क १३:१०
   4. लूक २४:४७
   5. योहान २०:२१
   6. प्रेषितांची कृत्ये १:८

**3. महान आज्ञेचा महान निष्कर्ष काय आहे?**
   a. मत्तय २४:१४
   b. प्रकटीकरण ७:९
   c. प्रकटीकरण ५:९
   d. दानिएल ७:१४

**4. शिष्य कोण आहे? आपण शिष्य कसे बनवायचे?**
   शिष्य हा ख्रिस्ताचा आज्ञाधारक अनुयायी असतो, जो इतरांना शिष्य बनवतो. आपण येशूने सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीचे पालन करण्यास त्यांना शिकवण्यांद्वारे शिष्य बनवतो. यामध्ये, सुवार्ता सांगणे, त्यांना येशूच्या आज्ञांचे पालन करण्यास शिकवणे आणि बायबलच्या इतर शिकवणींचा समावेश आहे, पवित्र आत्म्याद्वारे मार्गदर्शित मंडळी म्हणून प्रभुची उपासना करणाऱ्या विश्वासू शिष्यांच्या समुदायांची स्थापना करणे.


**5. महान आज्ञेचे कार्य पूर्ण झाल्यावर ते कसे दिसेल?**
   a. एकही व्यक्ती शिल्लक ना राहो. (२ पेत्र ३:९, १ तीमथ्य २:४)
   b. एकही जागा शिल्लक ना राहो (रोम करास १५:१९-२३)
   c. एकही भाषा शिल्लक ना राहो ( दानिएल ७:१४)
   d. एकही लोक गट शिल्लक ना राहो  (मत्तय २८:१९)

**6. महान आज्ञा कार्य पूर्ण करण्यासाठी काय लागेल?**
   a. भेदणारी प्रार्थना (१ इतिहास १४:११) (बाल-पेराझिम प्रार्थना)
   b. एकत्र काम करणे - एकता (योहान १७:११, लूक ५:७)
   c. चळवळींच्या चळवळी (प्रेषितांची कृत्ये ६:७, ९:३१

**7. महान आज्ञा पूर्ण करण्यासाठी ४ जमीन दृष्टीकोन काय आहे?**

   ***मार्क ४:२६-२९ वाचा.***

   **a. ४ जमीनी कोणत्या आहेत?**




- रिकामी जमीन - जमीन तयार करा - सुवार्ता तयारी (सुवार्ताप्रसारपुर्व)
- बीजित जमीन - सुवार्ता सांगा – सुवार्ता उघडणे (सुवार्ताप्रसार)
- वाढणारी जमीन - शिष्यत्व (सुवार्ता परिपक्वता)
- परिपक्व जमीन - मंडळी निर्मिती ( सुवार्ता प्रभाव)

**b. शेतकरी आपले पीक कापल्यानंतर काय करेल?**

i. पुन्हा पेरणीसाठी सर्वोत्तम बियाणे निवडा (नेतृत्व प्रशिक्षण)

ii. बियाणांची बहुगुणित वाढ - (सुवार्ता चळवळी)

**8. महान आज्ञेच्या पूर्णतेसाठी दर्शनाच्या ९ पायऱ्या.**



**9. रिकाम्या जमीनी काय आहेत?**

a) रिकामे लोक (मित्र, नातेवाईक, सहकारी, शेजारी)
b) रिकाम्या जागा (गावे, ठिकाणे, शेजार)

**10. आपण रिकामी जमीन कशी तयार करतो?**

**a. उघडी प्रार्थना** - उघडे हृदय, उघडे घर, उघडे डोळे, उघडे कान, उघडा स्वर्ग.
**b. आशीर्वाद प्रार्थना** - शरीर, श्रम, भावना, सामाजिक जीवन आणि आध्यात्मिक जीवनासाठी प्रार्थना करा. (**BLESS - B**ody, **L**abour, **E**motions, **S**ocial life, **S**piritual life)

**फ्रॅन प्रार्थनेद्वारे लोकांची मने तयार करा.**

**c. फ्रॅन प्रार्थना म्हणजे काय?**
(**FRAN**- **F**riends, **R**elatives, **A**ssociates, **N**eighbours).
मित्र, नातेवाईक, सहकारी, शेजारी (५ किंवा अधिक मित्र नातेवाईक सहकारी किंवा शेजाऱ्यांची नावे लिहा जे विश्वास ठेवत नाहीत. उघडी प्रार्थना आणि आशीर्वाद प्रार्थना सुरू करा. प्रार्थना आणि चालत प्रार्थनेद्वारे एकत्र न येता रिकाम्या जागा तयार करा.

| **प्रार्थनेसाठी माझी वचनबद्धता** | | | **नांव:- ---------------------** | |
|---|---|---|---|---|
| | **मित्र** | **नातेवाईक** | **सहकारी** | **शेजारी** |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

| फ्रॅन प्रार्थना | आशीर्वाद प्रार्थना | उघडी प्रार्थना | |
|---|---|---|---|
| मित्र | शरीर | उ | हृदय |
| नातेवाईक | श्रम | | डोळे |
| सहकारी | भावना | घ | कान |
| शेजारी | सामाजिक गरजा | | दार |
| | आत्मिक गरजा | डे | स्वर्ग |

| | |
|---|---|
| ५ | लोक |
| | मिनिट |
| | दिवस |
| | आठवडे |

**11. चालत प्रार्थना म्हणजे काय?**

चालत प्रार्थना हा मध्यस्थी प्रार्थनेचा एक प्रकार आहे ज्यामध्ये प्रार्थना करताना जवळच्या भागात किंवा विशिष्ट ठिकाणी चालणे समाविष्ट असते. तुम्ही चालत प्रार्थना करत असताना, तुमच्या प्रार्थना तुमच्या स्वतःच्या चिंतेच्या पलीकडे विस्तारतात, थेट त्या ठिकाणाच्या गरजांवर लक्ष केंद्रित करतात आणि त्यांना देवाच्या डोळ्यांनी आणि अंतःकरणाने पाहण्यासाठी स्वतःला उघडतात. तुम्ही चालत प्रार्थना केल्यानंतर देव दरवाजे उघडेल. चालत प्रार्थना तुम्हाला तुमचे क्षेत्र अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास देखील मदत करेल दोन्ही संधी आणि आव्हान.

**12. मी चालत प्रार्थना कशी करावी?**

a. दोन किंवा अधिक लोकांचा संघ तयार करा.
b. आध्यात्मिकरित्या तयार व्हा, पवित्र आत्म्याच्या आवाजासाठी खुले रहा.
c. ठिकाण आणि लोकांच्या गरजा पाहण्यासाठी खुले रहा.
d. उघडी प्रार्थना करा (दारे, डोळे, कान, हृदय, स्वर्ग).
e. ठिकाण आणि लोकांवर शांती आणि आशीर्वादाची घोषणा करा.
f. शांतीच्या माणसांसाठी प्रार्थना करा आणि त्यांना शोधा.

**13. आपण बिया कशा पेरल्या पाहिजेत? मी सुवार्ता कशी सांगावी?**

**a. माझ्या FRAN साठी प्रार्थना केल्यानंतर मी काय करावे.**
o त्यांची कथा, त्यांच्या समस्या, त्यांच्या जीवनातील परिस्थिती आणि त्यांची आव्हाने ऐका.
o अडचणी आणि आव्हानांच्या बाबतीत येशूने तुम्हाला कशी मदत केली ते तुमची कथा शेअर करा.
o परिस्थितीशी सुसंगत देवाची कथा किंवा येशूची कथा सांगा.

**b. बी काय आहे**?
बीज ही येशू ख्रिस्ताची सुवार्ता आहे.

**c. सुवार्ता म्हणजे काय?**
"2000 वर्षांपूर्वी, शास्त्रानुसार, देवाने येशूला या जगात पाठवले. तो पापरहित जीवन जगला, त्याने लंगड्यांना बरे केले, त्याने आंधळ्यांना बरे केले, त्याने बहिरे आणि कुष्ठरोग्यांना बरे केले, त्याने मेलेल्यांना उठवले. त्याला कालवरीच्या वधस्तंभावर खिळण्यात आले, दफन करण्यात आले आणि तिसऱ्या दिवशी तो पुन्हा उठला. तो स्वर्गात गेला आणि त्याने वचन दिल्याप्रमाणे तो परत येईल. त्याच्या नावाने पापाची क्षमा आणि तारण आहे."

**d. सुवार्ता कोण सांगू शकते?**
नवा जन्म झालेले सर्व विश्वासणारे पात्र आहेत आणि ते सुवार्तेचे पेरणारे असले पाहिजेत. (मार्क १:१७)

**e. नवीन विश्वासणाऱ्याने सुवार्ता सांगणे किंवा त्याचा विश्वास सांगणे केव्हा सुरू करावे?**
कथांमधील खालील लोकांप्रमाणे लगेच सुरुवात करा.
o शोमरोनी स्त्रीची कथा (योहान ४:५-३०)
o भूतबाधा झालेल्या माणसाची कथा (मार्क ५:१-२०)
o मूकबधिरांची कथा (मार्क ७:३१-३७)

**f. मी कोणाला सुवार्ता सांगू शकतो?**
तुमचे मित्र, नातेवाईक, सहकारी, शेजारी आणि इतर कोणाशीही सुवार्ता सांगा, जसा प्रार्थनेने अंतःकरण तयार केल्यानंतर पवित्र आत्मा मार्गदर्शन करतो तसा.

**g. मी माझी वैयक्तिक साक्ष किंवा कथा कशी तयार करावी?**
खालील प्रश्नांची उत्तरे लिहा किंवा रेकॉर्ड करा:
**i. येशू ख्रिस्ताचा स्विकार करण्यापूर्वी तुमचे जीवन काय होते?** (पाप, आजारपण, दारिद्र्य, भूतबाधा,व्यसने इत्यादी आणि त्याचा तुमच्या जीवनावर होणारा परिणाम)
**ii. तुम्ही तुमच्या जीवनात येशूला कसे प्राप्त केले?**
- तुम्हाला येशूबद्दल कोणी सांगितले?
- तुम्ही निर्णय कधी घेतला?
- परिस्थितीचे वर्णन करा.

**iii. तुम्ही येशूला तुमच्या जीवनात स्वीकारल्यानंतर काय झाले?**

- उपचार, सुटका, पापांची क्षमा, सवयींमध्ये बदल, शांतता इ.
- ख्रिस्ताचा आज्ञाधारक शिष्य बनणे.

**h. तुमची कथा तुमच्या FRAN सोबत शेअर करायला सुरुवात करा; आवश्यकतेनुसार बदल करा.**

## 14. सुवार्ता सांगत असतांना विचारणयासाठी कांही नमुना प्रश्न.

a. तुमची खात्री आहे का की तुमचा नवा जन्म झाला आहे?
b. जर आज तुम्ही मरण पावलात तर तुमचे काय होईल?
c. तुम्ही अनंतकाळ कुठे घालवणार? स्वर्गात की नरकात?

## 15. एखाद्या व्यक्तीचे तारण कसे होऊ शकते?

a. जर तुम्ही तुमच्या मुखाने घोषित केले की, "येशू प्रभु आहे," आणि तुमच्या अंतःकरणात विश्वास ठेवला की देवाने त्याला मेलेल्यांतून उठवले, तर तुमचे तारण होईल. (रोमकरांस १०:९)
b. परंतु जितक्या लोकांनी त्याला (येशूला) स्वीकारले, त्यांना त्याने देवाची मुले होण्याचे सामर्थ्य दिले, अर्थात त्यांना जे त्याच्या नावावर विश्वास ठेवतात. (योहान १:१२)

## 16. सुवार्ता सांगत असताना वापरण्यासाठी काही नमुना विधाने.

a. येशू तुमच्यावर प्रेम करतो.
b. येशू तुमची काळजी घेतो.
c. येशूवर विश्वास ठेवा
d. येशू तुम्हाला वाचवू शकतो.
e. येशू तुम्हाला बरे करू शकतो.
f. येशू पुन्हा परत येईल.
g. येशूच्या आगमनासाठी तयार रहा.
h. येशू तुम्हाला शांती देऊ शकतो.
i. येशू तुमच्या पापांची क्षमा करू शकतो.
j. येशू तुमचे जीवन बदलू शकतो.

## 17. मी एखाद्याला तारण अनुभवाकडे कसे नेऊ शकतो?

a. सोप्या भाषेत किंवा शब्दांत सुवार्ता स्पष्टपणे सांगा.
b. सुवार्ता सादरीकरणानंतर येशूला स्वीकारण्यासाठी निमंत्रण द्या
c. सुवार्ता निमंत्रणासाठी नमुना प्रश्न.

- तुम्ही येशूला तुमचा प्रभु आणि तारणारा म्हणून स्वीकारू इच्छिता का?
- नसल्यास, प्रार्थना करा. आशीर्वाद प्रार्थना.
- जर होय, तर त्याला/तिला कबुलीच्या प्रार्थनेसाठी घेऊन जा.

d. कबुलीची नमुना प्रार्थना.

हे प्रभु येशू, मी कबूल करतो की मी पापी आहे आणि मी माझ्या आयुष्यात खूप वाईट गोष्टी केल्या आहेत. माझा विश्वास आहे की तू या जगात आलास, माझ्यासाठी वधस्तंभावर मरण पावला, दफन करण्यात आला आणि 3 ऱ्या दिवशी पुन्हा उठला. मी विश्वास ठेवतो की तुम्ही वचन दिल्याप्रमाणे परत याल. मी विश्वास ठेवतो की तुझ्या नावात तारण आणि पापाची क्षमा आहे. प्रभु येशू, माझ्या जीवनात ये, माझ्या सर्व पापांची क्षमा कर आणि मला तुझ्या रक्ताने धु.

आजपासून मी तुझ्यासाठी जगेन. मी तुला माझ्या जीवनाचा प्रभु आणि तारणारा म्हणून स्वीकार करतो, येशूच्या नावाने, आमेन.

**18. तारणानंतर लगेचच नवीन विश्वासणाऱ्याला मी काय शिकवावे? (तत्काळ शिष्यत्व)**

**a. मोक्षाची खात्री द्या.**
- तुम्ही देवाचे मूल आहात. (योहान १:१२)
- तुमच्या पापांची क्षमा झाली आहे. (१ योहान १:९)
- तुझे नाव जीवनाच्या पुस्तकात लिहिलेले आहे. (प्रकटी २१:२७)
- तुमचा नवा जन्म झाला आहे. (योहान ३:३)

**b. त्यांना तुमच्या स्वर्गीय पित्याशी बोलण्यासारख्या साध्या प्रार्थना करायला शिकवा.**
प्रभूची प्रार्थना एक उत्तम नमुना आहे. (मत्तय ६:९-१३)

**c. त्यांना बायबल वाचायला आणि अभ्यास करायला शिकवा.**

**d. त्यांना साक्ष देण्यास शिकवा.**
येशूने त्यांच्या आयुष्यात काय केले ते त्यांचे मित्र, नातेवाईक, सहकारी, आणि शेजारी यांना लगेच सांगा.

**e. त्यांना विश्वासणाऱ्यांच्या समुदायाचा किंवा स्थानिक मंडळीचा भाग होण्यासाठी प्रोत्साहित करा.**
जर तेथे मंडळ्या नसतील, तर त्यांना त्यांच्या घरात नवीन मंडळी सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करा आणि प्रशिक्षण द्या.

**19. येशूच्या सात आज्ञा काय आहेत?**

**(अल्पकालीन शिष्यत्व)**

सखोल मार्गाने आज्ञा शिकवताना बायबलची एक कथा पूरक म्हणून शिकवा.

**a. पश्चात्ताप करा आणि सुवार्तेवर विश्वास ठेवा. (मार्क १:१५)**
- उधळपट्टी करणारा मुलगा (लूक १५:११-३२)

**b. पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा घ्या आणि पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा घ्या (मार्क १६:१६)**
- फिलिप आणि इथिओपियाचा नपुंसक (प्रेषितांची कृत्ये ८:२६-४०)

**c. देवावर प्रेम करा आणि तुमच्या शेजाऱ्यांवर प्रेम करा (मत्तय २२:३७-३९)**
- चांगल्या शोमरोनीची कथा (लूक १०:२५-३७)

**d. प्रार्थना करा आणि देवाच्या वचनाचा नियमित अभ्यास करा. ( योहान १५:७)**
- एका चिकाटीच्या मित्राची कथा (लूक ११:५-८)

**e. प्रभूच्या मेजामध्ये भाग घ्या आणि पवित्र जीवन जगा आणि विश्वासणाऱ्यांच्या समुदायाचा भाग व्हा. (लूक २२:१९)**
- प्रभूच्या मेजाची कथा (लूक २२:१४-२३)

**f. दशमांश आणि अर्पण द्या (प्रेषित २०:३५)**
- विधवेच्या नाण्याची कथा (लूक २१:१-४)

**g. जा आणि शिष्य करा. (मत्तय २८:१९)**
- आंद्रिया आणि मित्रांची कथा (योहान १:४३-५०)

**20. दीर्घकालीन शिष्यत्व म्हणजे काय?**

जुना करार आणि नवीन करार दोन्ही देवाचे वचन शिकवून ख्रिस्तामध्ये विश्वासणाऱ्याला मजबूत आणि प्रौढ बनवणे.

**a. प्रेषितांच्या शिकवणीपासून सुरुवात करा (प्रेषितांची कृत्ये २:४२-४७)**

- प्रेषितांची शिकवण
- सहभागिता
- भाकर मोडणे
- प्रार्थना, स्तुती आणि उपासना
- चिन्हे आणि चमत्कार
- एकमेकांसोबत वाटणे

**b. प्रेषितांची शिकवण (५ बोटांची तत्त्वे)**


**वैयक्तिक जीवन:** पवित्रता, प्रामाणिकपणा, सचोटी

**कौटुंबिक जीवन:** पती, पत्नी, मुले आणि पालक यांच्याशी नाते

**मंडळी जीवन:** एक कुटुंब म्हणून मंडळी आणि मंडळी मधील नातेसंबंध

**सामाजिक जीवन:** आपल्या शासकांचे पालन करा, त्यांच्यासाठी प्रार्थना करा आणि त्यांना आशीर्वाद द्या.

**अनंतकाळचे जीवन:** येशूचे दुसरे आगमन आणि मृत्यूनंतरचे जीवन.




**c. बायबल कथांद्वारे शिष्यत्व**

**i. हे काय म्हणते?**

कथा कथन म्हणून अचूकपणे शिकवा, जोपर्यंत प्रत्येकजण इतरांना सांगण्यास शिकत नाही तोपर्यंत पुनरावृत्ती करा. आवश्यकतेनुसार कृती, गाणी, नाटक वापरा.

**ii. याचा अर्थ काय?**

अर्थ समजून घ्या.

**iii. मी काय पाळावे?**

आज्ञाधारकपणा आणि इतरांबरोबर वाटण्यास प्रोत्साहित करा.

**iv. बायबलच्या कथा समजून घेण्याची तलवार पद्धत.**

- हे देवाबद्दल काय म्हणते?
- हे मानवाबद्दल काय म्हणते?
- पाळण्यासाठी एखादी आज्ञा आहे का?
- टाळण्यासारखे एखादे पाप आहे का?
- पाळण्यासाठी एखादे अभिवचन आहे का?
- अनुसरण करण्यासाठी एखादे उदाहरण आहे का?
- या कथेतून मी आणखी काय शिकू शकतो?
- मी आणखी कोणाला हि कथा सांगू शकतो?

**d. चर्चा आणि डिस्कव्हरी बायबल स्टडीज (DBS) वापरून बायबल कथा/ बायबलचे भाग शिकवणे.**

बायबल अभ्यास गटांसाठी एक नमुना चर्चा

**i.मागे पाहा:**

**वैयक्तिक सांगणे**

- तुम्ही कशासाठी आभारी आहात?
- तुम्हाला कोणत्या आव्हानांचा सामना करावा लागला?
- एकमेकांच्या गरजांसाठी प्रार्थना करा आणि एकमेकांना मदत करा.

**गेल्या आठवड्याचा धडा सांगणे.**

- गेल्या आठवड्यात तुम्ही काय शिकलात?
- मागील आठवड्यात धड्याच्या आधारे तुम्ही काय पाळले?
- तुम्ही जे शिकलात ते तुम्ही कोणाला शिकवले?

**ii.वर पाहा:**

- आजचा धडा किंवा कथा वाचा.
- हा परिच्छेद देव, येशू किंवा त्याच्या योजनेबद्दल काय म्हणतो यावर चर्चा करा.
- नवशिक्यांसाठी तलवार पद्धत वापरा.

**iii. पुढे पाहा:**

- आजच्या धड्याच्या आधारे तुम्ही कशाचे पालन कराल?
- तुम्ही कोणाला शिकवाल?

**e. देवाचा संपूर्ण सल्ला शिकवा. दूध ते मांस धोरण (इब्री ५:११-१४)**

- दररोज बायबल अभ्यास आणि प्रार्थना करण्याची सवय लावा.
- देवाची वाणी ऐका.
- देवाच्या आवाजाचे पालन करा.
- तुम्ही जे शिकलात ते इतरांना सांगण्याची सवय लावा.

## 21. मंडळ्यांची स्थापना.

**a. मंडळी म्हणजे काय?**

मंडळी म्हणजे प्रार्थनेसाठी, उपासनेसाठी, सुधारणेसाठी, सुवार्ता सांगण्यासाठी आणि समाजातील लोकांची सेवा करण्यासाठी नियमितपणे एकत्र जमणाऱ्या विश्वासणाऱ्यांचा समुदाय.

**b. मंडळीमध्ये कोणत्या आवश्यक गोष्टी घडल्या पाहिजेत?**

- प्रार्थना आणि सहभागिता.
- गीते आणि शब्दांनी परमेश्वराची उपासना करणे.
- बायबल वाचने, बायबल शिकवणे.
- साक्ष देणे आणि प्रभूला अर्पण देणे.
- एकमेकांसाठी प्रार्थना करणे.
- सुवार्ता सांगणे आणि गरजू लोकांची सेवा करणे.

**c. मंडळी मधील नेते कोण आहेत?**

- प्रेषित, संदेष्टे, शिक्षक, पाळक, सुवार्तिक (इफिस ४:११-१३)
- सेवक, वडील (तीत १:५, १ तीमथ्य ३:८)

**d. मी नवीन मंडळी कशी सुरू करू शकतो?**

- नियमितपणे भेटण्यासाठी ठिकाण आणि वेळ ठरवा.
- २-३ किंवा त्याहून अधिक लोकांसह साधी मंडळी सुरू करा. "कारण जेथे दोघे किंवा तीघे माझ्या नावाने एकत्र जमले आहेत, तेथे मी त्यांच्यामध्ये आहे" मत्तय १८:२०.
- तो एक सहभागी मेळावा बनवा (१ करिंथ १४:२६).
- मित्र, नातेवाईक, सहकारी आणि शेजारी यांना निमंत्रण द्या.
- मंडळीच्या प्रत्येक सदस्याला येशूने जे जे शिकवले आणि आज्ञापिले ते पालन करण्यासाठी शिष्य करा.
- प्रत्येक विश्वासणाऱ्याला आज्ञाधारक शिष्य आणि शिष्य बनवणारा होण्यासाठी सुसज्ज करा.
- जेव्हा विश्वासणारे प्रौढ शिष्य बनतात तेव्हा नवीन मंडळ्या सुरू करा.

**e. मी मंडळीचा कोणता नमुना सुरू करू शकतो?**

- सशासारखी साधी, बहुगूणीत होणारी, पुनरुत्पादन करणारी आणि शिष्य बनविणारी मंडळी लावा.

- प्रत्येक मंडळी पुनरुत्पादन करणारी असली पाहिजे.
- प्रत्येक प्रौढ शिष्याला नवीन चर्च सुरू करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.

**22. नेत्यांना सुसज्ज करणे:**

**a. मी मंडळीला प्रशिक्षण केंद्र कसे बनवू शकतो?**

- नियमित प्रशिक्षण कार्यक्रमात नावनोंदणी करण्यासाठी परिपक्व विश्वासणाऱ्याना ओळखा.
- प्रत्येक नवीन कराराची मंडळी हि प्रशिक्षण केंद्र असली पाहिजे, जी संतांना सेवेच्या कामासाठी सुसज्ज करते.
- संघटित अभ्यासक्रम-आधारित प्रशिक्षण कार्यक्रम घ्या.
- आठवड्यातून एकदा किंवा दोनदा किंवा महिन्यातून एकदा सुरुवात करा (लोकांच्या उपलब्धतेवर आणि स्थानिक सोयीनुसार लवचिक रहा.)
- आज्ञाधारकतेवर आधारित शिक्षणावर भर द्या.
- आज्ञाधारक शिष्य आणि नेत्यांसह सुरू ठेवा.
- प्रत्येक प्रशिक्षणार्थीला आज्ञा पाळण्यास आणि इतरांना प्रशिक्षित करण्यास प्रोत्साहित करा.
- प्रत्येक वेळी जेव्हा तुम्ही जमता तेव्हा उत्तरदायित्वाचे प्रश्न विचारा.

**23. मंडळी लावणी चळवळ काय आहे?**

मंडळी लावणी चळवळ (चर्च प्लांटिंग मूव्हमेंट CPM) ही दिलेल्या लोकांच्या गटात किंवा लोकसंख्येच्या विभागात स्थानिक मंडळ्यांनी मंडळ्यां लावण्या ची जलद आणि घातांकीय वाढ आहे. हे इतरांना आज्ञाधारक शिष्य होण्यासाठी प्रशिक्षण देण्याच्या तत्त्वावर आधारित आहे जे इतरांना मंडळ्यां लावण्यासाठी प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण देतात. तुम्ही एक मंडळी लावण्यापेक्षा इतरांना मंडळ्यां लावण्यासाठी प्रशिक्षण देणाऱ्यांना प्रशिक्षण देण्यावर भर दिला जातो. **मंडळ्यांच्या किमान ४ पिढयांना प्रोत्साहन द्या.**

**24. शिष्य बनवण्याची चळवळ काय आहे?**

डीएमएम चळवळ शिष्य बनवण्याच्या चळवळी (डीएमएम- डिसायपल मेकींग मुव्हमेंट) शिष्य बनवणाऱ्यां शिष्यांमध्ये जलद आणि घातांकीय वाढ आहे. प्रत्येक विश्वासणाऱ्याने आज्ञाधारक, पुनरुत्पादक शिष्य बनण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. ते देवाचा आवाज ऐकतील आणि ते जे शिकतात ते इतरांना पाळण्यासाठी आणि शिकवण्यासाठी वचनबद्ध होतील. प्रत्येक शिष्य शिष्य बनवनारा होतो आणि मंडळ्या लावतो ज्या बहुगुणित होतील. शिष्यांच्या किमान ४ पिढ्यांना प्रोत्साहन द्या.

**DMM शिष्यांनी शिष्य बनविण्यावर भर देते, तर CPM मंडळ्यांनी मंडळ्या लावण्यावर भर देते.**

**25. शिष्य बनवणे म्हणजे काय?**

"शिष्य बनवणे म्हणजे - एक हेतुपुरस्सर, नातेसंबंधित, ख्रिस्ताभिमुख कार्य आहे जे प्रत्येक विश्वासणाऱ्याद्वारे, प्रत्येक संधीचा वापर करून इतरांना येशूला जाणून घेण्यास, वाढण्यास आणि विश्वासूपणे अनुसरण करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी आणि शिकवण्यासाठी केले जाते. शिष्य बनवणे प्रत्येक विश्वासणाऱ्याने, प्रत्येक संधीद्वारे केले पाहिजे.

**26. आज्ञापालन-आधारित शिष्यत्व काय आहे?**

आज्ञापालन- आधारित शिष्यत्व येशूच्या प्रत्येक आज्ञा आणि शिकवणींचे लवकरात लवकर पालन करण्याचा आग्रह धरते. **विश्वासणाऱ्याच्या परिपक्वतेचा स्तर त्याच्या ज्ञानाच्या स्तरावर नव्हे तर आज्ञाधारकतेच्या प्रमाणावर ठरवला जातो**. येशूने "जा आणि शिष्य बनवा, बाप्तिस्मा घ्या आणि मी तुम्हाला सांगितलेल्या सर्व गोष्टींचे पालन करण्यास त्यांना शिकवा" असे शिकवले. म्हणून प्रत्येक विश्वासणाऱ्याने एक शिष्य आणि एक शिष्य बनवणारा असले पाहिजे.

**27. महान आज्ञेचे कार्य पूर्ण झाल्यावर ते कसे दिसेल?**

- प्रकटीकरण ७:९ म्हणते, "**प्रत्येक राष्ट्र, वंश, लोक आणि भाषा** यांच्यातील एक मोठा लोकसमुदाय देवाच्या सिंहासनासमोर उभा राहून त्याची उपासना करतील" .
- दानिएल ७:१४ म्हणते "**प्रत्येक भाषेतील** लोकांनी त्याची उपासना केली".
- मत्तय २४:१४ म्हणते, "राज्याची ही सुवार्ता **सर्व राष्ट्रांना** साक्षी म्हणून **सर्व जगात** गाजवली जाईल आणि मग शेवट येईल."

**28. महान आज्ञा पूर्ण करण्याच्या सोप्या व्याख्या:**

a. कोणतीही व्यक्ती शिल्लक नाही, कोणतीही जागा शिल्लक नाही, कोणतीही भाषा शिल्लक नाही, कोणताही लोक गट शिल्लक नाही
b. लोक गट, भाषा गट, शहरी भाग आणि भौगोलिक एकके (प्लग दृष्टीकोन)
c. एक विश्वासणारा, शरीर, बायबल आणि भेदणारी प्रार्थना (4 बी दृष्टीकोन)

**29. महान आज्ञा कार्य पूर्ण केले जाऊ शकते का?**

**डी.एल. मूडी** यांनी म्हटल्याप्रमाणे, "हे केले जाऊ शकते, हे केले पाहिजे, हे केलेच पाहिजे."

अधिक तपशीलवार अभ्यासासाठी, learnnn.com वर ऑनलाइन स्कूल ऑफ ग्रेट कमिशन ट्रेनिंग प्रोग्राममध्ये स्वतःची नोंदणी करा.

*The Global School of Great Commission – Global School of Great Commission (learnnn.com)*

## महान आज्ञेच्या पुस्तकाबद्दल

हे महान आज्ञेचे पुस्तक येशूची शेवटची आज्ञा समजून घेण्यासाठी एक साधे मार्गदर्शक आहे. याचा उपयोग मंडळीमधील प्रत्येक विश्वासणाऱ्यांना शिकवण्यासाठी केला जाऊ शकतो जेणेकरून ते महान आज्ञेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि ख्रिश्चन परिपक्वतेमध्ये देखील वाढू शकतील.

या पुस्तकाचा उद्देश महान आज्ञेचा सामान्य आढावा देणे हा आहे आणि चर्चा केलेल्या प्रत्येक मुद्द्याचे तपशीलवार वर्णन देणे नाही. सर्व प्रशिक्षणार्थींना बायबलमधील उल्लेखित संदर्भ वाचण्यासाठी आणि पाठान्तर करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. हे संदर्भ प्रत्येक विश्वासणाऱ्याने जाणून घेण्यासाठी बायबलमधील काही मूलभूत वचने मानली जातात.

प्रशिक्षक या पुस्तकाचा वापर त्यांच्या मंडळीतील किंवा समुदायातील सदस्यांना किंवा त्यांच्या शिष्यत्व गटातील सदस्यांना सहभागात्मक दृष्टिकोन वापरून शिकवण्यासाठी एक साधे मार्गदर्शक म्हणून करू शकतात.

या प्रशिक्षणाचा संपूर्ण उद्देश आज्ञाधारक शिष्य बनवणे हा आहे जे येशूच्या प्रत्येक आज्ञेचे पालन करतील आणि इतरांना प्रशिक्षण देण्यासाठी वचनबद्ध असतील.

# जा आणि शिष्य बनवा

### शिष्य बनविण्याच्या महान आज्ञेची परिपूर्णता करणे